

**Zilla Parishad Washim**

6h ·

जिल्हा परिषद वाशिम:
Hon. CEO
मा. श्री. वैभव वाघमारे सर यांचे स्वागत आणि
मा. श्रीमती वसुमना पंत मॅडम यांना निरोप
Programme@12/02/2024

लोकमत

# आतषबाजीत 'सीईओं'चे स्वागत अन् निरोप

## जिल्हा परिषदेच्या प्रांगणात रंगला सोहळा : मान्यवरांची उपस्थिती

**वाशिम :** जिल्हा परिषदेच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) वसुमना पंत यांना निरोप आणि विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांच्या स्वागताचा सोहळा फटाक्यांच्या आतषबाजीत १२ फेब्रुवारीला रात्री ७ ते १० या वेळेत जिल्हा परिषदेच्या प्रांगणात पार पडला.

पदाधिकारी आणि अधिकारी - कर्मचारी यांच्यावतीने आयोजित या सोहळ्याला अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषदेचे अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे तर प्रमुख पाहुणे म्हणून वस्त्रोद्योग विभागाचे (नागपूर) आयुक्त अविश्यांत पंडा, मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, जि. प. उपाध्यक्ष चक्रधर गोटे, माजी जि. प. अध्यक्ष अरविंद इंगोले, जि.प. सभापती अशोक डोंगरदिवे, वैशाली लळे, वैभव सरनाईक, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यशवंत सपकाळे, जि.प. सदस्य डॉ. सुधीर कवर, दिलीप देशमुख, पांडुरंग ठाकरे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. अधिकारी व कर्मचारी यांच्यावतीने कार्यक्रमस्थळी वसुमना पंत, अविशांत पंडा आणि वैभव वाघमारे या तीनही आयएएस अधिकाऱ्यांचे मोठ्या जल्लोषात आणि टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत करण्यात आले. सुरुवातीला सीईओ वैभव वाघमारे यांचा आणि नंतर वसुमना पंत यांचा पतीसह (अविशांत पंडा) भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी फटाक्यांची जोरदार आतषबाजी करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन शिक्षणाधिकारी (योजना) गजानन डाबेराव यांनी, तर यशवंत सपकाळे यांनी आभार मानले.



### वाशिमकरांकडून शिकायला खूप मिळाले - पंत

'वाशिमच्या जनतेकडून मला खूप शिकायला मिळाले असून त्यांनी दिलेले प्रेम शब्दात व्यक्त करता येणे शक्य नाही, असे भावनिक उद्गार काढून जिल्हा परिषदेतील कार्यकाळ कायम अविस्मरणीय राहील, असे मत वसुमना पंत यांनी व्यक्त केले. तर पंत यांच्या कारकिर्दीत सर्वांना मातृत्वाची गोडी लाभली. येणाऱ्या काळामध्ये कदाचित तुम्हाला पितृशक्तीची ताकददेखील पाहायला मिळेल, सूचक मत वैभव वाघमारे यांनी व्यक्त केले.

Hello Washim
Page No. 3 Feb 14, 2024
Powered by: erelego.com